दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 29 ■ शनिवार, 18 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

**सुविचार**

एखाद्याला हरवणे खूप सोप्पे आहे, पण त्याला जिंकणे खूप अवघड असते.




# रस्त्यांच्या कामांना गती द्या, अन्यथा कारवाई

## आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्याकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील रखडलेल्या रस्ते कामांसंदर्भात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी कडक भूमिका घेत अधिकाऱ्यांना कारवाईचा इशारा दिला. नागरिकांच्या वाढत्या तक्रारींचा विचार करून सर्व कामे तातडीने पूर्ण करा, चालढकल तसेच दर्जामध्ये तडजोड सहन केली जाणार नाही,अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असे त्यांनी ठणकावून सांगितले.



शहरात विविध योजनांतून मोठ्या प्रमाणात रस्ते मंजूर झाले असले, तरी प्रत्यक्षात काही कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी नियोजन भवन येथे संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावून आमदार पाटील यांनी कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अधिकाऱ्यांसह ठेकेदारांचीही त्यांनी झाडाझडती घेतली.पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला. तसेच शहरातील स्वच्छतेचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या स्पष्ट सूचना नगरपालिकेला देण्यात आल्या. जिजाऊ चौक ते सांजा या बार्शी-बोरफळ रस्त्याच्या कामातील अडथळे त्वरित दूर करून काम सुरू करण्याचे आदेश त्यांनी दिले.दरम्यान, जिजाऊ चौक ते शरद पवार हायस्कूल या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याची बाब निदर्शनास आणून देत संबंधित ठेकेदाराला कारवाईचा इशारा देण्यात आला. तसेच धुळीचा त्रास होणार नाही यासाठी या रोडवर दररोज दोनवेळा पाणी मारण्याची सूचना त्यांनी केली. स्टेशन रोडवरील अर्धवट कामे आणि चेंबरचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.रस्ते कामांवर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी आता दर आठवड्याला आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचेही आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. बैठकीस नगराध्यक्षा नेहाताई काकडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मोरे, मुख्याधिकारी नीता अंधारे, गटनेते अमित शिंदे, अक्षय ढोबळे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

### ठेकेदाराकडून दिशाभूल करणारी माहिती

जिजाऊ चौक ते शरद पवार हायस्कूल या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे एक बाजूने वाहतूक सुरू आहे.मात्र, रस्त्यावरील धूळ व्यापारी,नागरिकांना त्रासदायक ठरत आहे.त्यामुळे धूळ उडू नये,यासाठी रस्त्यावर वारंवार पाणी मारणे अपेक्षित आहे.प्रश्न उपस्थित झाल्यानंतर ठेकेदार अजमेरा यांनी या रस्त्यावर पाणी मारले जात असल्याचे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला.मात्र ही माहिती खोटी आणि दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आणून देताच आमदार पाटील यांनी ठेकेदाराला कडक शब्दात सूचना केल्या. तसेच स्टेशन रोडवरील चेंबरच्या कामाबाबत बांधकाम विभागाच्या मोरे यांनी चुकीची माहिती दिली.

---

**धाराशिवमध्ये जिल्हा परिषदेत ५ तर व पंचायत समितीत २२ स्वीकृत सदस्यांना संधी मिळण्याची शक्यता**

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य नेमण्याचा मार्ग मोकळा; शासनाचे राजपत्र प्रसिद्ध

## 'आरंभ मराठी' च्या बातमीवर शिक्कामोर्तब



आरंभ मराठी । धाराशिव

**महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तज्ज्ञांचा सहभाग वाढवण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, २०२६ लागू केला आहे. या नव्या तरतुदीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत (नामनिर्देशित) सदस्यांची नियुक्ती केली जाणार असून त्यांना मतदानाचा अधिकार नसेल. धाराशिव जिल्ह्यातही या निर्णयामुळे ५ जिल्हा परिषद व सुमारे २० ते २२ पंचायत समिती सदस्यांना संधी मिळणार असून स्थानिक राजकारणात नव्या घडामोडींना सुरुवात झाली आहे. आरंभ मराठीने दिनांक ५ मार्च रोजीच्या अंकात स्वीकृत सदस्यांची बातमी दिली होती. या बातमीवर आता शिक्कामोर्तब झाले आहे.**



दैनिक आरंभ मराठी
05 Mar 2026 - Page 1
epaper.arambhmarathi.com

जिल्हा परिषदेत ५ तर पंचायत समित्यांमध्ये २२ स्वीकृत सदस्यांना संधी मिळणार

स्वीकृत सदस्य नियुक्तीचा निर्णय लवकरच होणार लागू; इच्छुक कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता

आरंभ मराठी
सज्जन यादव
प्रतिनिधी - धाराशिव

धाराशिव जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याचा मार्ग राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे मोकळा झाला असून, धाराशिव जिल्हा परिषदेत किमान ५ तर जिल्ह्यातील ८ पंचायत समित्यांमध्ये सुमारे २० ते २२ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती होणार आहे. जिल्हा परिषद सदस्य संख्येच्या १० टक्के आणि पंचायत समिती सदस्य संख्येच्या २० टक्के सदस्य स्वीकृत म्हणून नियुक्त करता येणार असल्याने स्थानिक राजकारणात नव्या घडामोडींना सुरुवात झाली आहे. निवडणुकीत संधी न मिळालेल्या इच्छुकांना आता 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी मिळणार असल्याने आतापासूनच फिल्डिंग लावण्यास सुरुवात झाली आहे. स्वीकृत सदस्य नियुक्तीचा अधिकृत निर्णय अजून जिल्हा प्रशासनाकडे आला नसला तरी लवकरच तो निर्णय येणे अपेक्षित आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांची तरतूद करण्याचा प्रस्ताव राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला होता. ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना संधी मिळावी आणि स्थानिक प्रशासनात अधिक प्रभावी सहभाग मिळावा या उद्देशाने हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मंत्रिमंडळाने या प्रस्तावास गुरुवारी (दि.२६) मंजुरी दिल्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील आठवड्यात यासंदर्भात अधिकृत निर्णयाची घोषणा होऊन तसा लेखी आदेश जिल्हा प्रशासनाकडे येण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्हा परिषदेत सध्या एकूण ५५ सदस्य निवडून आलेले आहेत. त्यामध्ये भाजपचे १९, शिवसेनेचे १५, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ६, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे ७, काँग्रेसचे ३, अपक्ष ४ आणि समाजवादी पक्षाचा १ सदस्य निवडून आलेला आहे. या संख्येच्या १० टक्के नियमानुसार जिल्हा परिषदेत किमान ५ स्वीकृत सदस्य नेमणे बंधनकारक राहणार आहे. सत्तास्थिती पाहता महायुतीला ४ तर महाविकास आघाडीला १ स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये भाजपला २ आणि शिवसेनेला २ सदस्य नियुक्त करण्याची संधी मिळू शकते. तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात समन्वय साधून एकाला प्रतिनिधित्व देण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. त्यामुळे स्वीकृत सदस्यपदासाठी इच्छुकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

निर्णय पंचायत समितीसाठी देखील होणार लागू

धाराशिव जिल्ह्यातील ८ पंचायत समित्यांमध्ये एकूण ११० सदस्य आहेत. त्याच्या २० टक्के नियमानुसार सुमारे २० ते २२ स्वीकृत सदस्य नियुक्त करता येणार आहेत. त्यामध्ये भूम पंचायत समितीत २, वाशीमध्ये १, कळंबमध्ये ३, धाराशिवमध्ये ५, परांडा २, तुळजापूर ४, लोहारा २ आणि उमरगा पंचायत समितीत २ स्वीकृत सदस्य नेमण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अनेक इच्छुकांनी उमेदवारीसाठी प्रयत्न केले होते. मात्र मर्यादित जागांमुळे अनेकांना संधी मिळू शकली नव्हती. अशा कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी देण्याचे आश्वासन काही नेत्यांनी दिले होते. आता मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे या कार्यकर्त्यांच्या आशा पुन्हा जागृत झाल्या असून स्वीकृत सदस्यपदासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. स्वीकृत सदस्यपदासाठी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने राजकीय पक्षांच्या नेत्यांसमोर समतोल राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. प्रत्येक पक्षाकडून इच्छुकांची संख्या जास्त असल्याने नियुक्ती करताना राजकीय समीकरणे, कार्यकर्त्यांचे योगदान आणि पक्षनिष्ठा यांचा विचार केला जाणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याच्या निर्णयामुळे स्थानिक प्रशासनात अनुभवी आणि सक्रिय कार्यकर्त्यांना संधी मिळणार असून ग्रामीण भागातील विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्वीकृत सदस्य पदावर डोळा ठेवून कार्यकर्त्यांनी आतापासूनच फिल्डिंग लावण्यास सुरुवात केलेली आहे. स्वीकृत सदस्य नियुक्तीचा निर्णय झाला असला तरी त्यासंदर्भात अधिकृत निर्णय जिल्हा प्रशासनाला अजूनही प्राप्त झालेला नाही. परंतु, इच्छुक कार्यकर्ते मात्र कामाला लागले आहेत.

महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात गुणवत्ता आणि तज्ज्ञांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, २०२६ लागू केला आहे. या अधिनियमाला राज्यपालांची मान्यता मिळाल्यानंतर १५ एप्रिल २०२६ रोजी तो राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे. या सुधारणा अंतर्गत जिल्हा परिषदांमध्ये नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी हे निवडून आलेल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या १० टक्के किंवा किमान ५ सदस्य (जे अधिक असेल) इतक्या संख्येने प्रशासनातील विशेष ज्ञान, अनुभव किंवा कौशल्य असलेल्या व्यक्तींना नामनिर्देशित करू शकणार आहेत. मात्र, या नामनिर्देशित सदस्यांना जिल्हा परिषद किंवा संबंधित समित्यांच्या बैठकीत मतदानाचा अधिकार नसेल. तसेच अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा समितीच्या सभापतीपदी निवडून येण्याचा हक्कही त्यांना दिलेला नाही. त्यांचा कार्यकाळ हा संबंधित जिल्हा परिषदेच्या मुदतीइतकाच राहणार आहे. पंचायत समित्यांबाबत निवडून आलेल्या सदस्यांच्या २० टक्के किंवा किमान १ सदस्य (जे अधिक असेल) इतक्या संख्येने नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती केली जाऊ शकते. या सदस्यांनाही मतदानाचा व पदाधिकारी होण्याचा अधिकार नसणार आहे. नामनिर्देशन प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी अध्यक्षांच्या निवडणुकीनंतर विशेष बैठक बोलावणार असून, त्या बैठकीत विविध राजकीय पक्ष व गटांचे संख्याबळ विचारात घेऊन नामनिर्देशन केले जाणार आहे. नामनिर्देशित सदस्यांची नावे राज्य निवडणूक आयोगामार्फत अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध केली जाणार आहेत.

### जिल्हा परिषदेत ५ स्वीकृत सदस्यांना संधी मिळणार

धाराशिव जिल्हा परिषदेत किमान ५ तर जिल्ह्यातील ८ पंचायत समित्यांमध्ये सुमारे २० ते २२ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती होणार आहे. जिल्हा परिषद सदस्य संख्येच्या १० टक्के आणि पंचायत समिती सदस्य संख्येच्या २० टक्के सदस्य स्वीकृत म्हणून नियुक्त करता येणार आहे. जिल्हा परिषदेत सध्या एकूण ५५ सदस्य निवडून आलेले आहेत. त्यामध्ये भाजपचे १९, शिवसेनेचे १५, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ६, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे ७, काँग्रेसचे ३, अपक्ष ४ आणि समाजवादी पक्षाचा १ सदस्य निवडून आलेला आहे. या संख्येच्या १० टक्के नियमानुसार जिल्हा परिषदेत किमान ५ स्वीकृत सदस्य नेमणे बंधनकारक राहणार आहे. सत्तास्थिती पाहता महायुतीला ४ तर महाविकास आघाडीला १ स्वीकृत सदस्य नियुक्त करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये भाजपला २ आणि शिवसेनेला २ सदस्य नियुक्त करण्याची संधी मिळू शकते. तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात समन्वय साधून एकाला प्रतिनिधित्व देण्याची शक्यताही व्यक्त होत आहे.

### पंचायत समितीत २० ते २२ स्वीकृत सदस्य

हा निर्णय पंचायत समितीसाठी देखील लागू होणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील ८ पंचायत समित्यांमध्ये एकूण ११० सदस्य आहेत. त्याच्या २० टक्के नियमानुसार सुमारे २० ते २२ स्वीकृत सदस्य नियुक्त करता येणार आहेत. त्यामध्ये भूम पंचायत समितीत २, वाशीमध्ये १, कळंबमध्ये ३, धाराशिवमध्ये ५, परांडा २, तुळजापूर ४, लोहारा २ आणि उमरगा पंचायत समितीत २ स्वीकृत सदस्य नेमण्याची शक्यता आहे.

---

# लाडक्या बहिणींना लाभ का बंद झाला, कारण जिल्हा स्तरावर कळणार



आरंभ मराठी । धाराशिव

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत राज्यभरातून लाखो महिलांची नावे वगळण्यात आली आहेत. लाखो महिलांचा लाभ अचानक बंद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यात धाराशिव जिल्ह्यातील एक लाखांहून अधिक महिलांचा समावेश असल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. अनेक महिलांना लाभ बंद होण्यामागचे नेमके कारण अद्याप समजलेले नसल्याने संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, ज्या महिलांचा लाभ बंद झाला आहे त्यांनी थेट जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून कारण जाणून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

संबंधित कार्यालयातून प्रत्येक लाभार्थीला लाभ बंद होण्यामागचे नेमके कारण स्पष्ट केले जाणार आहे. दरम्यान, केवायसी (KYC) प्रक्रियेतील त्रुटी हे एक प्रमुख कारण असल्याचे समोर येत आहे. महिलांना केवायसी दुरुस्तीसाठी 30 एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील सुमारे 38 हजार महिलांची नावे केवायसी दुरुस्तीसाठी प्रलंबित होती. त्यापैकी 36 हजार महिलांनी दुरुस्ती पूर्ण केली असली, तरीही अनेक महिलांचा नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारीनंतर लाभ बंद झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. केवायसी पूर्ण करूनही लाभ बंद झाल्याने महिलांमध्ये संभ्रम अधिक वाढला आहे. त्यामुळे संबंधित महिलांनी आपल्या अर्जाची स्थिती आणि लाभ बंद होण्यामागील कारण थेट कार्यालयातून तपासून घ्यावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. महायुती सरकारसाठी गेम चेंजर ठरलेली ही योजना सध्या विविध कारणांनी पुन्हा चर्चेत आली आहे. अचानक मोठ्या प्रमाणात नावे वगळल्यामुळे महिलांमध्ये नाराजीचा सूर उमटत असून, प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर स्पष्टता आणावी, अशी मागणी जोर धरत आहे.

---

**आरंभ मराठी** | **आमदार कैलास पाटील यांची मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे मागणी**

# तांत्रिक उत्पादनावर नको, पीक कापणी प्रयोगावरच पीक विमा द्या

आरंभ मराठी । धाराशिव

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत यंदा पीक कापणी प्रयोग व तांत्रिक उत्पादन असे निकष लावले आहेत. तांत्रिक निकषाचा आधार घेतल्यानंतर शेतकऱ्यांना पिक विमा मिळणे कठीण होणार आहे. त्यामुळे फक्त पीक कापणी प्रयोग याच्या आधारेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात देण्यात यावी अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यावेळी आमदार पाटील म्हणाले की, २०२५-२६ खरीप हंगामामध्ये धाराशिव जिल्हयामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत जिल्ह्यातील ४ लाख, ९६ हजार १९ शेतकऱ्यांनी ३ लाख ९६ हजार ४३५ हेक्टर क्षेत्रावरील उडीद, कापूस, पिके आय. सी. आय.सी. आय. लोंबार्ड इन्शुरन्स कंपनीकडे संरक्षित केली होती. जिल्हयातील सर्वच महसुल मंडळात २२० वेळा अतिवृष्टी झाली असून त्यापैकी १५९ वेळा ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये झाली आहे. या



कालावधीत सरासरीच्या १५९.७० टक्के एवढे पर्जन्यमान झाले आहे. ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये म्हणजे ऐन सोयाबीन पिक फुलोरा व पक्वतेच्या अवस्थेत असतानाच अतिवृष्टी झाल्याने, सततच्या पावसाने शेतात पाणी साचून राहिल्याने पिकावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणे, पिकातील धान्य कुजणे, मूळ कुज होणे, मान कुज होणे, धान्याला मोड येणे, धान्य काळे पडणे, धान्याची प्रत खराब होणे, नद्या, नाले ओसंडून वाहिल्यामुळे पिके वाहून जाणे इत्यादी बाबींमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.जुन ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान अतिवृष्टी,सततच्या पावसाने जिल्ह्यात पिकांचे नुकसान झाल्याने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी यांच्यामार्फत बाधित पिकांचे,क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले असून जिरायत, बागायत व फळपिकांच्या एकून ६ लाख ६९ हजार १७२ क्षेत्रापैकी ५ लाख ७७ हजार ५४४.६२ हेक्टर क्षेत्र (८६%) बाधित झाले आहे. जिल्ह्यात एकूण २१९० पिक कापणी प्रयोगाचे नियोजन करण्यात आले होते. पैकी मुख्य पिक असलेल्या सोयाबिन पिकाचे ५०४ पिक कापणी प्रयोगाचे नियोजन करण्यात आले होते. त्यापैकी ३६८ पिक कापणी प्रयोगावर कंपनीने आक्षेप घेतले होते. पीक कापणी प्रयोगावर कंपनीने घेतलेल्या आक्षेपावर जिल्हास्तरीय आढावा समितीसमोर तसेच राज्य स्तरीय तांत्रिक सल्लागार समितीसमोर सुनावणी होऊन समितीकडून सदरील आक्षेप फेटाळण्यात आल्याचे पाटील पत्रात म्हणाले आहेत.

### शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही

तांत्रिक उत्पादनाचा विचार केल्यास अधिक उत्पादनामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार नाही. शेतकऱ्यावर खूप मोठ्या प्रमाणावर अन्याय होण्याचा धोका आहे.तांत्रिक उत्पादन व पीक कापणी प्रयोगाच्या ५०:५० टक्के या अन्यायी अटीमुळे जवळपास १३ ते १४ महसूल मंडळातील एकाही शेतकऱ्याला कसल्याही प्रकारची भरपाई मिळणार नसल्याने त्यांच्यावर अन्याय होणार आहे. तसेच ज्या मंडळातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार आहे ती अतिशय कमी मिळणार आहे.पिकांच्या नुकसानभरपाईसाठी तांत्रिक उत्पादनाचा विचार न करता झालेल्या पीक कापणी प्रयोगाच्या आधारे समप्रमाणात व अधिकच्या रकमेने म्हणजे नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना दिलेल्या हेक्टरी ३७ हजार रुपये प्रमाणे नुकसानभरपाई निश्चित करून शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याबाबत कृषी विभाग व विमा कंपनीला आदेशित करावे अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.

### नवा निकष शेतकऱ्यांसाठी अडचणीचा

नवीन निकष शेतकऱ्यांसाठी अडचणीचे आहेत.पिक कापणीचे उत्पादन ३ ते ४ क्विंटल प्रति हेक्टर आणि तांत्रिक उत्पादन १० ते १२ क्विंटल प्रति हेक्टर येते.५०:५० निकषामुळे भरपाईवर परिणाम होत आहे.विमा कंपनीला फायदा होईल अशा प्रकारचे धोरण सरकारने राबवले आहे. त्याचा तोटा आता शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळे यामध्ये सुधारणा करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळेल असे धोरण सरकार राबवण्याचे धाडस दाखवेल का? असा सवाल आमदार कैलास पाटील यांनी सरकारला विचारला आहे.

---

# गोरोबा काका समाधी सोहळ्यानिमित्त तेर येथे भव्य कुस्ती आखाडा; सोमनाथ मानेंनी चांदीची गदा पटकावली

आरंभ मराठी । तेर

वैराग्य महामेरू संतश्रेष्ठ श्री संत गोरोबा काका यांच्या वार्षिक समाधी सोहळ्यानिमित्त तेर ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती आखाड्यात तेरच्या शिवछत्रपती तालीम संघाचा पैलवान सोमनाथ माने याने औंध (पुणे) येथील जय हनुमान आखाड्याचा पैलवान विजय मोटे याच्यावर मात करत मानाची शेवटची कुस्ती जिंकली. या विजयासह त्याने चांदीची गदा आणि रोख २१ हजार रुपयांचे बक्षीस पटकावून मानकरी ठरला.राज्यभरातील लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या संत गोरोबा काकांच्या वार्षिक यात्रोत्सवानिमित्त हा कुस्ती आखाडा मोठ्या उत्साहात पार पडला. उद्घाटन भाजपचे युवानेते मल्हार पाटील, सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामपंचायत अधिकारी बाबासाहेब खोचरे, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ पसारे, गोरोबा पाडूळे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या आखाड्यास धाराशिव जिल्ह्यासह मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील विविध भागांतून मोठ्या संख्येने पैलवान सहभागी झाले होते. तसेच कुस्तीप्रेमी नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. आखाड्यात १०० रुपयांपासून ते २१ हजार रुपयांपर्यंतच्या कुस्त्या रंगल्या. शेवटच्या मानाच्या कुस्तीसाठी चांदीची गदा व २१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या



लढतीत सोमनाथ माने याने विजय मोटेवर मात करत विजय संपादन केला. विजेत्या पैलवानांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. दरम्यान, ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती आखाड्याकडे काही ग्रामपंचायत सदस्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र दिसून आले. या स्पर्धेत भागवत भक्ते, मारुती इंगळे, शामराव गायके, नानासाहेब भक्ते, रतन नाईकवाडी, एनआयएस कुस्ती प्रशिक्षक गोविंद घारगे, नवनाथ पसारे, बालाजी भक्ते, संजय जाधव, राजेंद्र पसारे, भगवान मोरे यांनी पंच म्हणून काम पाहिले.

# परंड्यातील कमांडो करिअर अकॅडमीमुळे होतकरू मुलांच्या स्वप्नांना मिळाले पंख

## ७०० हून अधिक विद्यार्थ्यांना शासकीय नोकरी; मेजर तनपुरे यांचा समाजाभिमुख उपक्रम ठरतोय प्रेरणादायी





अर्जुन गोडगे । आरंभ मराठी

परंडा : परंडा शहरात उभी राहिलेली कमांडो करिअर अकॅडमी आज गोरगरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. मेजर महावीर तनपुरे यांनी २०१७ साली या अकॅडमीची स्थापना करून समाजाला काहीतरी देण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरवला. शासकीय सेवेतून निवृत्तीनंतर त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून युवकांना दिशा देण्याचे कार्य हाती घेतले असून, त्यांच्या या उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सोलापूर, अहिल्यानगर, बीड, संभाजीनगर, जालना यांसह राज्याच्या विविध भागांतून विद्यार्थी येथे प्रशिक्षणासाठी दाखल होत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत स्थान मिळवून देण्याचा ध्यास मेजर तनपुरे यांनी घेतला आहे.

### ७०० हून अधिक विद्यार्थ्यांचे यश

गेल्या नऊ वर्षांत (२०१७ ते २०२६) या अकॅडमीतील ७०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विविध शासकीय सेवांमध्ये यश संपादन केले आहे. पोलीस भरती, आर्मी भरती तसेच इतर स्पर्धा परीक्षांसाठी येथे दर्जेदार मार्गदर्शन दिले जाते. हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांच्या आयुष्यात स्थैर्य निर्माण करण्यात या अकॅडमीचा मोठा वाटा आहे.

### भुईकोट किल्ल्यासाठी स्वच्छता अभियान

अकॅडमीचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून सामाजिक जबाबदारीची जाणीवही विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाते. दर दोन ते तीन महिन्यांनी परंड्यातील भुईकोट किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबवली जाते. या मोहिमेत ५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होत असून, किल्ल्याच्या जतन आणि संवर्धनासाठी मोलाचे योगदान दिले जाते.

### वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धन

पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी अकॅडमीच्या माध्यमातून दरवर्षी शंभरहून अधिक झाडांचे रोपण केले जाते. आषाढी एकादशी तसेच पावसाळ्याच्या सुरुवातीला शहरातील विविध भागांत वृक्षारोपण करून त्याचे संगोपनही केले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान आणि पर्यावरणाची जाणीव निर्माण होत आहे.

### शिवरायांच्या विचारांची प्रेरणा

मेजर तनपुरे यांनी स्वखर्चाने खाजगी जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारला आहे. आकर्षक विद्युत रोषणाईमुळे हा परिसर लक्षवेधी ठरतो. शिवरायांच्या प्रेरणादायी विचारांवर चालत समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा ते विद्यार्थ्यांना देतात. या पुतळ्याकडे पाहून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रेरणा मिळावी, हा त्यामागील उद्देश आहे.

### गरजूंसाठी मोफत प्रशिक्षणाची सोय

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना अकॅडमीमध्ये पूर्णपणे मोफत प्रशिक्षण दिले जाते. इतर विद्यार्थ्यांसाठीही अत्यंत माफक शुल्कात दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध आहे. त्यामुळे मराठवाड्यातील एक अग्रगण्य प्रशिक्षण केंद्र म्हणून कमांडो करिअर अकॅडमीची ओळख निर्माण झाली आहे.

### समाजाभिमुख नागरिक घडवण्याचा संकल्प

एकंदरीत, परंड्यातील कमांडो करिअर अकॅडमी ही केवळ नोकरीची तयारी करून देणारी संस्था नसून समाजाभिमुख, जबाबदार आणि स्वावलंबी नागरिक घडवण्याचे कार्य प्रामाणिकपणे पार पाडत आहे. मेजर तनपुरे यांचा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# तुळजाभवानी देवींसाठी कर्नाटकातील भक्ताकडून ३ लाखांची देणगी



**तुळजापूरः-** कर्नाटक राज्यातील बीदर जिल्ह्यातील हुमनाबाद तालुक्यातील नांदगाव येथील श्री तुळजाभवानी देवींचे निष्ठावंत भक्त मल्लिकार्जुन कलगी यांनी शुक्रवार (दि. १७) रोजी तुळजापूर येथे येऊन देवींच्या चरणी ३ लाख रुपयांची देणगी अर्पण केली. मल्लिकार्जुन कलगी हे तुळजापूर येथे देवीच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन घेतल्यानंतर त्यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडे ही देणगी सुपूर्द केली.यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा देवीची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी जनसंपर्क अधिकारी अभिजीत तेरखेडकर तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# खंडणीच्या मागणीवरून महिलेवर जीवघेणा हल्ला; वाशी पोलिसांत गुन्हा दाखल

आरंभ मराठी । वाशी

वाशी फाट्याजवळील गायरानात वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदण्याचे काम करत असताना एका महिलेवर खंडणीच्या मागणीवरून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत फिर्यादी शोभा धोंडीराम जाधव (वय 43, रा. कैकाडी गल्ली, मंडई परंडा ता. परंडा जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 14 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 ते 11 वाजण्याच्या सुमारास त्या गायरानात काम करत असताना आरोपी पांडुरंग लक्ष्मण माने, राजु लक्ष्मण माने, नाना अंकुश माने व सलमान पठाण (सर्व रा. भुम ता. भुम जि. धाराशिव) यांनी सहा लाख रुपयांची खंडणी मागितली. खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण करून जाधव यांना गंभीर जखमी केले. तसेच त्यांच्या दोन मोबाईल फोन हिसकावून घेतले. यावेळी जेसीबी ऑपरेटर मनोज धनवे यांनाही आरोपींनी शिवीगाळ करून मारहाण केली व त्यांच्याकडील मोबाईल फोन काढून घेतला. या प्रकरणी शोभा जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पवनचक्कीतील तांब्याच्या तारा चोरणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळल्या

## ८ गुन्हे उघड, ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून पवनचक्की परिसरात दरोडे व चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अशा घटनांसाठी जबाबदार असलेली टोळी स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली असून, या कारवाईत ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून तब्बल ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ८ गुन्हे उघडकीस आले आहेत. याविषयी सविस्तर माहिती अशी की, दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उमरेगव्हाण शिवारात पवनचक्कीवर कार्यरत दोन सुरक्षारक्षकांना दोरीने बांधून त्यांना मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याच्या तारा व रोख रक्कम लुटून आरोपी पसार झाले होते. याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच प्रकारच्या चोरीच्या घटना जिल्ह्यात इतर ठिकाणीही घडल्या होत्या. या गंभीर व अतिसंवेदनशील गुन्ह्यांची दखल घेत पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी सपोनि सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ढोकी–कळंब रोडवरील गोविंदपूर पाटी येथे सापळा रचून ५ संशयित आरोपींना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या



आरोपींकडून २ महिंद्रा स्कॉर्पिओ, १ बोलेरो, तांब्याच्या तारा व रोख रक्कम असा एकूण ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीदरम्यान आरोपींनी मेंढा, उमरेगव्हाण, चिकुंद्रा, गंधोरा, कन्हेरवाडी व वाशी परिसरात पवनचक्कीचे साहित्य चोरी केल्याची कबुली दिली. तसेच चोरी करताना सुरक्षारक्षकांना धमकावण्यासाठी मारहाण केल्याचेही त्यांनी सांगितले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सुनिल कालिदार शिंदे (रा. ढोकी), लखन बापू पवार (रा. उपळा), सिद्राम पोपट पवार (रा. वरूडा), उद्धव बापू शिंदे (रा. बावी) आणि विक्रम लक्ष्मण पवार (रा. खामकरवाडी) अशी आहेत. त्यांच्या इतर साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार तसेच बेंबळी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# घारगावात रहस्यमय ड्रोनची दहशत कायम

## सलग सहा दिवसांपासून गावकरी काढताहेत रात्र जागून,गुढ उकलेना

आरंभ मराठी । कळंब



कळंब तालुक्यातील घारगाव येथे गेल्या काही दिवसांपासून अज्ञात ड्रोनची रहस्यमय वर्दळ सुरू असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी गावावर फिरणारे हे ड्रोन नेमके कोणाचे आणि कोणत्या उद्देशाने फिरत आहेत, याचा उलगडा अद्याप झालेला नसल्याने नागरिकांच्या मनात अनेक शंका निर्माण होत आहेत.

गेल्या आठवड्यात गावात घरफोडीची घटना घडली होती. गणेश बाबुराव कुंभकर्ण यांच्या घरातून तीन तोळे सोन्याचे दागिने व १५ हजार रुपये रोकड चोरीस गेली होती. तसेच कल्याण कुंभकर्ण, हनुमंत कुंभकर्ण व प्रकाश तापडिया यांच्या घरात चोरीचा अयशस्वी प्रयत्न झाला होता. अनेक घरांची कुलपे तोडून चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याने गावकरी आधीच दहशतीखाली होते. अशातच आता ड्रोनच्या माध्यमातून गावाची रेकी सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे चोरट्यांनी गुन्हेगारीसाठी नवे तंत्र वापरण्यास सुरुवात केली का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, मध्यरात्रीच्या सुमारास आकाशात प्रकाशझोतासह दोन ते तीन ड्रोन गावावर घिरट्या घालताना दिसत आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांनी रात्रभर जागून पहारा देण्यास सुरुवात केली आहे. महिलांमध्ये, वृद्धांमध्ये आणि लहान मुलांमध्येही भीतीचे वातावरण आहे. दोन दिवसांपूर्वी दैनिक आरंभ मराठीच्या प्रतिनिधींनी शिरढोणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. कोळेकर यांच्याशी संपर्क साधला असता, गावात गस्त वाढविण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली होती. विशेष म्हणजे, ज्या दिवशी पोलिसांनी गस्त वाढवली त्या दिवशी हा प्रकार थांबला होता. मात्र त्यानंतर पुन्हा गावात अज्ञात ड्रोन घिरट्या घालताना दिसल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे.या संदर्भात शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री कोळेकर यांनी सदरील प्रकरणाची सविस्तर माहिती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे पाठविण्यात आल्याचे समजते.दरम्यान, पोलिस प्रशासनाने या प्रकरणाचा तातडीने छडा लावावा, गावात नियमित गस्त वाढवावी, ड्रोन उडवणाऱ्यांचा शोध घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.घारगावातील या प्रकारामुळे ग्रामीण भागातही गुन्हेगारीचे नवे तंत्र समोर येत असल्याची चर्चा रंगली असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### ड्रोनचा गुन्हेगारीसाठी होऊ शकतो गैरवापर

ड्रोनचा वापर एखाद्या परिसराची रेकी, घरांची रचना पाहणे, लोकांच्या हालचालींवर नजर ठेवणे, निर्जन घरे ओळखणे आणि चोरीसाठी मार्ग निश्चित करणे यासाठी केला जाऊ शकतो. काही प्रकरणांत ड्रोनद्वारे वस्तूंची वाहतूक, गुप्त चित्रीकरण किंवा नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचाही प्रयत्न होऊ शकतो. विनापरवानगी अज्ञात ड्रोन सलग अनेक दिवस एखाद्या गावावर फिरत असल्यास तो गंभीर बाब मानली जाते. अशा प्रकारांची माहिती तातडीने पोलिस प्रशासन, स्थानिक महसूल यंत्रणा प्राधिकरणाला देणे आवश्यक आहे. संशयास्पद ड्रोनचा तपास करून त्यामागील उद्देश स्पष्ट करणे गरजेचे ठरते.

दैनिक आरंभ मराठी

## दहीवडीत दिव्यांग शेतकऱ्याची १८ वर्षांची आमराई आगीत भस्मसात

# महावितरणच्या निष्काळजीपणाचा फटका

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील दहिवडी येथे महावितरणच्या दुर्लक्षामुळे एका दिव्यांग शेतकऱ्याच्या १८ वर्षांच्या कष्टांची राखरांगोळी झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. वीजवाहिन्यांमध्ये झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत बाबासाहेब निवृत्ती पाटील यांच्या फळबागेतील आंब्याची झाडे जळून खाक झाली. या दुर्घटनेत अंदाजे २० ते २५ लाख रुपयांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधारच नष्ट झाला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि.१५) दुपारी सुमारे १:३० वाजण्याच्या सुमारास कडक उन्हात गट क्रमांक ४९३ आणि ४९५ मधील शेतातून गेलेल्या वीजवाहिन्यांवर अचानक शॉर्ट सर्किट झाले. या घटनेतून उडालेली ठिणगी खाली




साचलेल्या वाळलेल्या गवतावर पडताच क्षणार्धात आगीने भीषण स्वरूप धारण केले. वाऱ्याचा वेग आणि उन्हाची तीव्रता यामुळे आग झपाट्याने पसरत संपूर्ण आमराईला वेढा घालू लागली. काही क्षणांतच बाबासाहेब पाटील यांनी वर्षानुवर्षे जपलेली १८ वर्षांची आंब्याची बाग आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. विशेष म्हणजे, बाबासाहेब पाटील हे दिव्यांग असूनही त्यांनी आपल्या जिद्दीच्या बळावर ही आमराई उभी केली होती. पोटच्या मुलाप्रमाणे जपलेल्या या बागेवर त्यांचा संपूर्ण उदरनिर्वाह अवलंबून होता. यंदा आंब्याचे पीकही जोमात आले होते आणि त्यातून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, एका क्षणात सर्व काही उद्ध्वस्त झाले. या आगीत केवळ झाडेच जळाली नाहीत, तर गेल्या अनेक वर्षांचा उत्पादन खर्च, कष्ट आणि भविष्यातील उत्पन्नाचे साधनही पूर्णपणे नष्ट झाले. या घटनेमुळे दहिवडी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना पसरली आहे. महावितरणच्या लोंबकळणाऱ्या तारा, जुनाट वीजवाहिन्या आणि उन्हाळ्यापूर्वी आवश्यक देखभाल न केल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. यापूर्वीही अशा घटनांची शक्यता व्यक्त करूनही संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या भीषण आगीमुळे झालेल्या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन महसूल विभाग आणि महावितरणने संयुक्तपणे तात्काळ घटनास्थळी पंचनामा करावा, अशी मागणी ग्रामस्थ आणि शेतकरी संघटनांनी केली आहे. बाबासाहेब पाटील यांना विशेष बाब म्हणून शासन स्तरावरून जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात येत आहे.

### अन्यथा जगणे कठीण होईल

मी माझ्या अपंगत्वाचा विचार न करता रात्रंदिवस कष्ट करून ही बाग फुलवली होती. ही झाडेच माझ्या जगण्याचा आधार होती. आज माझ्या डोळ्यांसमोर सर्व काही जळून खाक झाले. शासनाने तात्काळ मदत न केल्यास माझे जगणे कठीण होईल.

**बाबासाहेब पाटील**
शेतकरी

**हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)**
**संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०** RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
**पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.**

# पळसप पंचायत समिती गणात 'जनता दरबार' कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## सभापती व गटविकास अधिकाऱ्यांसमोर नागरिकांनी मांडल्या समस्या

**आरंभ मराठी । पळसप**

पळसप येथे पंचायत समिती धाराशिव यांच्या वतीने सभापती गोकर्णा गोपाळ कदम यांच्या अध्यक्षतेखाली पळसप गणासाठी 'जनता दरबार' या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पळसप गणातील पळसप, सारोळा, घोगरेवाडी, म्होतरवाडी, पाणवाडी, कोळेकरवाडी, कोल्हेगाव आदी गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जनता दरबारामध्ये नागरिकांनी आपल्या गावांतील विविध समस्या व अडचणींचा पाढा सभापती व गटविकास अधिकारी यांच्यासमोर मांडला. पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, शासकीय योजनांचा अपुरा लाभ, तसेच ग्रामपंचायत स्तरावरील विविध कामांबाबत तक्रारी करण्यात आल्या.विशेषतः काही नागरिकांनी ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर आरोप यावेळी मांडले. या तक्रारींची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान पंचायत समिती अंतर्गत रस्ते, पाणी ,शिक्षण, आरोग्यसेवा व इतर शासनाच्या विविध वयक्तिक लाभाच्या योजना यासंबंधी माहिती जाणून घेत योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन सभापती कदम यांनी दिले. या कार्यक्रमाला पंचायत समिती सभापती गोकर्णा गोपाळ कदम, जिल्हा परिषद सदस्य अजित लाकाळ, पंचायत समिती सदस्य (पळसप गण) शामल पाटील, जागजी गणाचे सदस्य पांडुरंग सावंत, तसेच संतोष नलावडे (सहाय्यक गटविकास अधिकारी धाराशिव), एन एस पवार (विस्तार अधिकारी), अनिल पडवळ (केंद्र प्रमुख शिक्षण विभाग), श्री धावणे, (तांत्रिक अधिकारी प. समिती), गिरी प्रमोद (तालुका आरोग्य अधिकारी) , श्री बनसोडे, (गृहनिर्माण अभियंता), श्रीमती कुलकर्णी (अंगणवाडी पर्यवेक्षिका) यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.




### ग्रामसेवकाडून वरिष्ठांची व जनतेची दिशाभूल

पळसप येथील ग्रामसेवकांनी पंचायत समिती सभापती, सहाय्यक गटविकास अधिकारी आणि जनतेची दिशाभूल केली. ग्रामपंचायतने केलेल्या खर्चाबाबत प्रश्न उपस्थित केले. नवीन प्रिंटर खरेदी आरओ प्लांट खरेदी, पाणीपुरवठा साहित्य यासाठी खर्च दाखविण्यात आला असला तरी प्रत्यक्षात साहित्य कुठे आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला. यावेळी ग्रामसेवकांनी चुकीची माहिती देऊन उपस्थित अधिकाऱ्यांची व नागरिकांची दिशाभूल केली.

**ज्ञानेश्वर दाणे**
ग्रामस्थ, पळसप.

### सिंचन विहिरीचा लाभ एकरकमी द्यावी

मनरेगा अंतर्गत मंजूर झालेल्या सिंचन विहिरींचा लाभ वेळेवर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मजूर उपलब्ध न होणे, मस्टर वेळेवर निघत नसणे, आणि रक्कम उशिरा मिळणे या समस्यांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत आहेत. त्यामुळे सिंचन विहिरीसाठीचा लाभ एकरकमी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा अथवा तशी शिफारस केंद्र सरकारकडे करावी.

**अजित चौधरी**
ग्रामस्थ पळसप

### दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन

जनता दरबारादरम्यान ग्रामस्थांनी पळसप ग्रामपंचायतीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. कामे न करता बिले काढल्याच्या तक्रारीही मांडण्यात आल्या. यावर सहाय्यक गटविकास अधिकारी संतोष नलावडे यांनी सांगितले की, संबंधित तक्रारींची चौकशी सुरू असून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात युवक काँग्रेसचा इशारा

## शेतकऱ्यांच्या हितासाठी तहसीलदारांना निवेदन



**आरंभ मराठी । उमरगा**

भारत-अमेरिका प्रस्तावित व्यापार कराराविरोधात उमरगा-लोहारा युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. हा करार शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि अन्नसुरक्षेसाठी घातक ठरणार असल्याचा आरोप करत तो तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष हनुमंत सांगवे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या करारामुळे अमेरिकेतील कृषी उत्पादनांवर शून्य टक्के आयात शुल्क लागू होण्याची शक्यता असून स्वस्त विदेशी माल भारतीय बाजारात मोठ्या प्रमाणावर येईल. याचा थेट फटका स्थानिक शेतकऱ्यांना बसून शेतीमालाच्या किंमती कोसळण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, भारतातील बहुतांश शेतकरी लहान व अल्पभूधारक असून त्यांच्याकडे आधुनिक साधने व पुरेसे सरकारी पाठबळ नाही. अशा परिस्थितीत अमेरिकेतील अनुदानित व मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांशी स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांसाठी कठीण ठरणार आहे. हा करार शेतकऱ्यांविरोधातील असमान स्पर्धा निर्माण करणारा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा करार शेतकरीविरोधी असून देशाच्या आत्मनिर्भरतेस बाधा आणणारा असल्याचा आरोप करत तो तात्काळ रद्द करावा, अशी मागणी युवक काँग्रेसने केली आहे. तहसीलदारांनी हे निवेदन शासनापर्यंत तातडीने पोहोचवावे, अशीही मागणी करण्यात आली. या निवेदनावर युवक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या असून प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी हनुमंत सांगवे, गणेश पवार (जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस ग्रामीण धाराशिव), धीरज सोनवणे (प्रदेश सचिव, युवक काँग्रेस) आणि दादासाहेब बिराजदार आदी उपस्थित होते.

# मोहा येथे 'महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात; 497 नागरिकांना थेट लाभ



**आरंभ मराठी । मोहा**

कळंब तालुक्यातील मोहा येथे महसूल विभागामार्फत शुक्रवारी (दि.१७) रोजी राबविण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करून शासकीय सेवा थेट लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण व फीत कापून करण्यात आले. या शिबिरात महसूल विभागासह भूमी अभिलेख, ग्रामविकास, कृषी, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन, एस.टी. महामंडळ, आरोग्य, शिक्षण आदी मिळून एकूण १९ विविध विभागांचा सक्रिय सहभाग होता. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसुली तसेच इतर शासकीय योजनांशी संबंधित विविध समस्या व तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी तहसील कार्यालयाने सर्व विभागांशी समन्वय साधत प्रभावी अंमलबजावणी केली. शिबिरादरम्यान एकूण ४०४ नागरिकांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला, तर विविध विषयांशी संबंधित ९३ अर्ज स्वीकृत करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ४९७ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शिबिरामुळे शासनाच्या योजना अधिक सुलभ व परिणामकारक ठरत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले. या कार्यक्रमास कळंब उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार हेमंत ढोकले, नायब तहसीलदार गोकुळ भराडिया, समाज कल्याण सभापती जि.प. विश्वास कोकणे, उपसभापती पं.स. प्रणिता चव्हाण, सभापती पं.स. राज्यश्री वरपे, माजी जि.प. सदस्य संदीप मडके, उपसरपंच बशारत मोमीन, जि.प. सदस्य रूपाली नागटिळक, जयवंत कुंभार, अनुराधा दिघे, सुवर्णा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विस्तार अधिकारी साळुंखे, महिला व बालविकास अधिकारी ए.बी. थोरात, महिला बालकल्याण प्रकल्प अधिकारी लक्ष्मण वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय मोहा महसूल मंडळातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मंडळ अधिकारी कल्पना मुंडे, मोहा ग्राम महसूल अधिकारी राधा भंगे, आरती देवकर, राहुल निकम, गणेश कुंभार, जयराज कुलकर्णी, डोंगरे, कृषी सहाय्यक बालाजी देशमुख, बापू काळे, विविध गावांचे पोलीस पाटील, सर्व बीएलओ, महसूल सेवक बालाजी फरताडे, अर्जुन शिंदे, सुनील माळी, धनाजी देवकर, ग्रामपंचायत शिपाई नाना शेंडगे, महादेव पायाळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाडोळी (आ.) येथील वीज समस्येवर तातडीने उपाययोजना करा

## ॲड. अजित गुंड-पाटील यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

**आरंभ मराठी । धाराशिव**

पाडोळी (आ.) येथील अनियमित वीजपुरवठा व ट्रान्सफॉर्मर बिघाडाच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी रूपामाता फाऊंडेशनच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन सादर करण्यात आले. धाराशिव येथे आलेल्या उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन फाऊंडेशनचे सचिव तथा विश्व हिंदू परिषद उपाध्यक्ष धाराशिव ॲड. अजित व्यंकटराव गुंड-पाटील यांनी ग्रामस्थांच्या अडचणी मांडल्या. पाडोळी (आ.) गावामध्ये मागील काही दिवसांपासून अत्यंत अनियमित वीजपुरवठा होत असून वारंवार वीज खंडित होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे.वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. तसेच कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने घरगुती व शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांवर परिणाम होत असून नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. गावातील ट्रान्सफॉर्मरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याचा संशय व्यक्त करून त्याची तात्काळ तपासणी व दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नियमित व सुरळीत वीजपुरवठा करण्याबाबतही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या समस्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास ग्रामस्थांच्या वतीने तसेच विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून महावितरण विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# तेरखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रात जनआरोग्य समितीची बैठक

## अडचणी सोडवण्याच्या झेडपी सदस्य विकी चव्हाण यांच्या सूचना

**आरंभ मराठी । तेरखेडा**



वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जनआरोग्य समितीची बैठक पार पडली. आरोग्य सेवांबाबतच्या समस्या आणि अडीअडचणींवर या बैठकीत चर्चा करत नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचा सखोल आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान विकी चव्हाण यांनी आरोग्य केंद्रातील त्रुटींबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत त्या तात्काळ सोडवण्याचे स्पष्ट आदेश दिले. आवश्यक उपाययोजना विलंब न करता राबवण्याच्या सूचना देत आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्यावर भर देण्यात आला.सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळणे हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. तेरखेडा परिसरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी पुढील काळात ठोस पावले उचलली जातील, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.या बैठकीस उपाध्यक्ष तथा पंचायत समिती सदस्य बालाजी अण्णा घोलप, आरोग्य अधिकारी गोवर्धन महिंद्रकर, प्रथम वैद्यकीय अधिकारी प्रियदर्शनी सोनवणे, रोकडे सर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

# प्राची मुकडे CBSE दहावीमध्ये जिल्ह्यात अव्वल

**आरंभ मराठी । उमरगा**

धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील जवळगा बेट येथील प्राची मुकडे हिने CBSE दहावी परीक्षेत ९९.२०% (४९६/५००) गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल गावकऱ्यांच्या वतीने प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. प्राचीच्या यशामागे तिची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. ग्रामीण पार्श्वभूमीतून येऊनही तिने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# आमदार प्रवीण स्वामी यांच्या मध्यस्थीनंतर उपोषण मागे

**आरंभ मराठी । उमरगा**



पुनर्वसित गावांच्या कबाले (मालकी प्रमाणपत्र) वाटपाच्या मागणीसाठी प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण अखेर आमदार प्रवीण स्वामी यांच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. उपविभागीय अधिकारी (SDO) यांच्या दिनांक १ जानेवारी २०२६ रोजीच्या आदेशानुसार पुनर्वसन गावांचे कबाले वाटप होणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासनाकडून या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करत आंदोलकांनी १ एप्रिल रोजी उपोषणाचा इशारा दिला होता. जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार उमरगा यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने आंदोलकाने अखेर १५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून आमरण उपोषण सुरू केले. दरम्यान, आमदार प्रवीण स्वामी यांनी घटनास्थळी भेट देत प्रशासनाशी चर्चा केली आणि या प्रकरणात तातडीने तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

दैनिक आरंभ मराठी

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

# ३७ कोटींचे विक्रमी कर्जवाटप; महिला सक्षमीकरणात जिल्ह्याचा नवा पॅटर्न

**आरंभ मराठी । धाराशिव**

महिलांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीचा कणा असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) धाराशिव जिल्हा कार्यालयाने २०२५-२६ या वर्षात राज्यात दुसरा क्रमांक पटकावून नवा इतिहास रचला आहे. सन मागील २९ वर्षांत पहिल्यांदा सांघिक कामगिरीच्या जोरावर 'माविम'ने ही मोठी झेप घेतली आहे. यामुळे जिल्ह्याचा महिला. सक्षमीकरणाचा नवा पॅटर्न आता राज्यासमोर आला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.बचतगटांना आर्थिक बळ देण्यासाठी माविमने यंदा ३७ कोटी २१ लक्ष रुपयांचे बँक कर्ज उपलब्ध करून दिले. विशेष म्हणजे, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा १० कोटींनी अधिक कर्जवाटप झाले आहे. याशिवाय 'व्हल्नरेबल सपोर्ट फंड'च्या माध्यमातून विधवा, परित्यक्ता, दिव्यांग व अल्पभूधारक अशा ५१२ गरजू महिलांना ७६ लक्ष ८० हजार रुपयांची थेट आर्थिक मदत देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणले आहे. कुक्कुटपालन, शेळीपालन, दाल मिल आणि हळद प्रक्रियेसारख्या उपप्रकल्पांमध्ये जिल्ह्याने १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. जिल्ह्यात नव्याने तीन महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आणि 'लाडकी बहिण' महिला सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आली आहे. या माध्यमातून महिला आता केवळ 'बचत' न करता 'उद्योजक' बनण्याकडे यशस्वीपणे वाटचाल करत आहेत.केवळ आर्थिकच नव्हे, तर आरोग्य क्षेत्रातही माविमने ठसा उमटवला आहे. जिल्ह्यातील ६४ गावांतील ४,९६० महिलांची हिमोग्लोबिन, रक्तदाब व मधुमेह तपासणी.आणि ३,००० हून अधिक महिलांना बियाणे वाटप करून पोषण आहार चळवळ राबविण्यात आली आहे. 'माविम मित्र मंडळ' स्थापन करून ६० गावांतील पुरुषांना स्त्री-पुरुष समानता व महिलांच्या मालमत्ता हक्काबाबत प्रशिक्षित करण्यात आले.

### तुळजापुरात लवकरच उमेद मॉल



बचतगटांच्या माध्यमातून वाढलेल्या उत्पन्नामुळे महिलांनी आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण दिले आहे. आज या महिलांची मुले कृषी अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, पीएसआय आणि सैन्य दलात कार्यरत आहेत, ही या चळवळीची मोठी पावती ठरली आहे. सलग चार वर्षे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत धाराशिव जिल्हा प्रथम राहिल्यानंतर आता माविमने राज्यात दुसरा क्रमांक पटकावणे ही अभिमानास्पद बाब आहे. या यशामुळे जिल्ह्यातील महिलांच्या आत्मविश्वासाला नवे बळ मिळावे यासाठी जिल्ह्यात तुळजापूर येथे आपण उमेद मॉल सुरू करीत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

# राज्यस्तरीय विश्वकोश स्पर्धेत माडज येथील ग्रामीण प्रशालेचे यश

**आरंभ मराठी । माडज**



महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित 'विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धा 2026' मध्ये ग्रामीण प्रशाला, माडज या शाळेने उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. राज्य शासनाच्या या स्पर्धेत शहरी व ग्रामीण अशा दोन विभागांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. ग्रामीण विभागात प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर उत्कृष्ट यश मिळवले. इयत्ता नववीतील रामेश्वर दाजीबा फुगटे व किरण दयानंद सुगावे या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर चौथा क्रमांक पटकावत रोख ७,५०० रुपये, प्रमाणपत्र व मेडल मिळवले. तसेच संस्कार विठ्ठल नागणे व प्रणिता दिनकर पाटील यांनी पाचवा क्रमांक मिळवत ५,००० रुपये, प्रमाणपत्र व मेडल पटकावले. जिल्हास्तरावर समर्थ नंदकुमार जाधव, प्रतिक विठ्ठल भोसले व प्रतीक्षा बाळू फुगटे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले. त्यांनी ३,०००, २,००० व १,००० रुपये रोख, प्रमाणपत्र व मेडल असे बक्षीस मिळवले. तालुकास्तरावर निकिता नवनाथ सूर्यवंशी व ईश्वर शिवशरणाप्पा कुंभार यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावत प्रत्येकी १,००० व ५०० रुपये रोख, प्रमाणपत्र व मेडल मिळवले.या सर्व विद्यार्थ्यांना उपक्रम शिक्षक डॉ. बालाजी मदन इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशालेत सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब पेठसांगवीकर, विक्रम चव्हाण, व्यंकटेश चव्हाण, पांडुरंग मुंडकर, उदय राठोड, श्रीमती अनिता कांबळे यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षांच्या हस्ते मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात या यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

# धानुरी परिसरात गौण खनिज माफियांचा धुमाकूळ; महसूल प्रशासनावर संशयाची छाया

## रात्रीच्या अंधारात लाखोंचा गोरखधंदा; शेतकऱ्यांना धमक्या, कारवाईची मागणी





**आरंभ मराठी । लोहारा**

लोहारा तालुक्यातील धानुरी व परिसरातील गावांमध्ये अवैध गौण खनिज उत्खननाचा धुमाकूळ सुरू असून, या माध्यमातून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार रात्रीच्या वेळी सर्रासपणे सुरू असून, 'रात्रीस खेळ चाले' या म्हणीप्रमाणेच प्रत्यक्षात हा गोरखधंदा सुरू असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत. धानुरी सर्कलमधील वैयक्तिक मालकीच्या शेतजमिनी, गायरान क्षेत्र तसेच शासकीय गावठाणातून मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन सुरू आहे. या माफियांनी स्वतःचे संघटित नेटवर्क तयार केले असून, टिप्पर वाहनांसोबत मोटारसायकली, चारचाकी वाहने आणि खासगी सुरक्षा रक्षकांचा गराडा ठेवून मोठ्या प्रमाणात खडक, दगड आणि मुरूमाचे उत्खनन व वाहतूक केली जात आहे. या अवैध खनिजाची विक्रीही बाजारभावापेक्षा जास्त दराने होत असल्याचे ग्राहकांकडून सांगितले जात आहे. या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे काही जण दहा ट्रिपची रॉयल्टी काढून पन्नास ट्रिपपर्यंत खनिजाची वाहतूक करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गेल्या पाच ते सहा महिन्यांत खाजगी कामांसाठी काढण्यात आलेल्या रॉयल्टी चलनांची नोंद तहसील कार्यालयात आढळून न आल्याने महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. धानुरी येथील साठवण तलाव परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून हजारो ट्रिप मुरूमाची वाहतूक सुरू असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन होऊनही महसूल प्रशासन कोणतीही ठोस कारवाई करत नसल्याने हा पैसा नेमका कुणाच्या घशात जातो? असा सवाल सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून हा अवैध व्यवहार सुरू असल्याचा आरोपही नागरिकांकडून होत आहे. या संदर्भात लोहारा तहसीलदारांशी संपर्क साधला असता त्यांनी "तात्काळ पथक पाठवून चौकशी करून अहवाल मागवतो" असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात आजही मुरूमाचे उत्खनन सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, स्थानिक शेतकऱ्यांनी गंभीर तक्रारी मांडल्या आहेत. "रात्रीच्या वेळी माफिया तलावातून मुरूम काढून नेतात. त्यामुळे शेतात जाण्याचे रस्ते उद्ध्वस्त झाले आहेत. पाईपलाइन फोडणे, वायर तोडणे असे प्रकार घडत असून, विरोध केल्यास धमक्या दिल्या जात आहेत," अशी व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. महसूल प्रशासनाकडून योग्य कारवाई होत नसल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी लोहारा तहसीलदारांना निवेदन दिले आहे. तसेच लवकरात लवकर कठोर कारवाई न झाल्यास सर्व शेतकरी एकत्र येऊन तहसील कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. सध्या संपूर्ण प्रकरणामुळे लोहारा महसूल विभाग संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून, प्रशासनाने तत्काळ कारवाई करून या अवैध उत्खननाला आळा घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# संत गोरोबा काका समाधी सोहळ्यात नवा उपक्रम

## मंदिर पायरी भजन सोहळ्याची परंपरा सुरू



**आरंभ मराठी । तेर**

वैराग्य महामेरू संत गोरोबा काका यांच्या समाधी सोहळ्यात यंदापासून एक अभिनव आणि भक्तिमय उपक्रमाची भर पडली आहे. वारकरी फडकरी दिंडी संघटना, श्री क्षेत्र तेर यांच्या पुढाकारातून दरवर्षी मंदिर पायरी भजन सोहळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यावर्षी हा सोहळा प्रथमच उत्साहात पार पडला. ह.भ.प. महादेव महाराज तांबे आळणीकर (जिल्हाध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, समाधी सोहळ्यासाठी विविध भागांतून येणाऱ्या वारकरी, फडकरी, दिंड्या आणि भाविकांच्या सहभागातून मंदिराच्या पायरीवर भजनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.बाराव्या शतकातील संतश्रेष्ठ गोरोबा काका हे संत परंपरेतील एक थोर संत व संत परीक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभाव आजही वारकरी संप्रदायात दिसून येतो. त्यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या तेर नगरीत दाखल होतात. तेरणा नदीकाठचा परिसर यामुळे भक्तिमय वातावरणाने भारून जातो.गोरोबा काकांचा महिमा चिरंतन राहावा आणि वारकरी परंपरेला चालना मिळावी, या उद्देशाने समस्त वारकरी, फडकरी भजन संघटना पंढरपूर अंतर्गत उपशाखा तेर यांच्या वतीने हा मंदिर पायरी भजन सोहळा सुरू करण्यात आला आहे. ही परंपरा पुढील काळात कायम राखली जाणार असल्याचेही यावेळी जाहीर करण्यात आले. या प्रसंगी ह.भ.प. विष्णू महाराज कबीर, ह.भ.प. राशनकर महाराज पंढरपुरकर, ह.भ.प. महादेव महाराज तांबे आळणीकर, ह.भ.प. ज्ञानेश्वर तांबे महाराज आळणीकर, ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. थोपटे महाराज देहूकर, ह.भ.प. योगेश्वर महाराज इंगळे, ह.भ.प. एकनाथ महाराज कापसे यांच्यासह उपसरपंच श्रीमंत फंड, तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर, सुधाकर बुकन आणि अनेक फडकरी, दिंडी प्रमुख व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाडोळी ( आ)—टाकळी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ॲड. व्यंकट गुंड यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**आरंभ मराठी । धाराशिव**

परळी ते अक्कलकोट या राज्य मार्गावरील पाडोळी (आ.) ते टाकळी या रस्त्याची अत्यंत खराब झालेली अवस्था लक्षात घेऊन तात्काळ दुरुस्ती व मजबुतीकरण करण्याची मागणी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य अँड. व्यंकट गुंड यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. यासोबतच सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडेही त्यांनी निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.) ते टाकळी हा रस्ता मागील दोन वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून, हा मार्ग दोन मोठ्या गावांना तसेच जिल्ह्याशी जोडणारा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहन चालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरील खराब अवस्थेमुळे एस.टी. बस सेवा देखील बंद करण्यात आली असून, त्यामुळे नागरिक, विद्यार्थी आणि शेतकरी यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडथळे निर्माण होत असून त्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे. तसेच ऊस वाहतुकीसाठी जड वाहनांची सततची ये-जा होत असल्यामुळे रस्त्याची दुरवस्था अधिकच वाढली आहे. पावसाळ्यात चिखलामुळे या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत कठीण बनते. यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले असून अनेकांना दुखापत व अपंगत्व आले आहे. या सर्व बाबींचा विचार करून पावसाळ्यापूर्वी संबंधित रस्त्याची तात्काळ पाहणी करून दुरुस्ती व मजबुतीकरणाचे काम हाती घ्यावे, तसेच शाळा सुरू होण्यापूर्वी हा रस्ता सुस्थितीत करावा, अशी मागणी अँड. व्यंकट गुंड यांनी केली आहे.

# राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेत भूम तहसील कार्यालयात अनियमितता

**आरंभ मराठी । भूम**

भूम येथील तहसील कार्यालयामध्ये राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीत गंभीर अनियमितता समोर आली असून काँग्रेस पक्षाच्या वतीने याचा निषेध नोंदविण्यात आला आहे. मार्च अखेरीस मंजूर झालेल्या सहा प्रस्तावांपैकी केवळ दोन प्रस्ताव ऑनलाइन प्रणालीत दिसत असून उर्वरित चार प्रस्ताव तांत्रिक गोंधळामुळे गायब झाल्याची बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे मंजुरी मिळूनही संबंधित लाभार्थी कुटुंबांना आर्थिक मदतीपासून वंचित राहावे लागत आहे. कुटुंबातील कमावता सदस्य गमावलेल्या या कुटुंबांवर आधीच संकट कोसळले असताना, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे त्यांचा हक्काचा आधार हिरावला जात असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे. तात्काळ तांत्रिक त्रुटी दूर करून प्रलंबित लाभार्थ्यांना निधी वितरित करावा, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे..ही मागणी भूम-परंडा-वाशी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष मोईज सय्यद शेखापुरकर यांनी केली. यावेळी धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विलास शाळू, तालुकाध्यक्ष रुपेश शेंडगे, एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष ॲड. मुशरफ सय्यद, भूम नगर परिषदेचे माजी नगरसेवक सोपान वरुडे, ॲड. सोहेल शेख, उमेश ढगे, रमेश पवार, अमोल वाघमारे यांसह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# प्राचार्य वैजनाथ घोडके यांचा 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' पदवीने आंतरराष्ट्रीय सन्मान

**आरंभ मराठी । तुळजापूर**



तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य वैजनाथ घोडके यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ व उल्लेखनीय योगदानाबद्दल 'युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका'कडून प्रतिष्ठित 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' (D.Sc.) पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. डॉ. एस. राधाकृष्णन रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर (ऑल इंडिया टीचर्स वेल्फेअर असोसिएशन) यांच्या विशेष शिफारशीनुसार घोडके यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. या वेळी धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार तसेच तहसीलदार व व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. प्राचार्य घोडके यांचे शैक्षणिक क्षेत्रातील समर्पित कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीची त्यांची तळमळ आणि विद्यालयाच्या प्रगतीसाठी घेतलेले प्रयत्न याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. हा सन्मान संपूर्ण श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय परिवारासाठी अभिमानास्पद मानला जात आहे. या यशाबद्दल विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले असून विविध स्तरातूनही त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# वाचन उपक्रमातून बाबासाहेबांची जयंती साजरी

## आरसोली जिल्हा परिषद शाळेचा उपक्रम

**आरंभ मराठी । भूम**

भूम तालुक्यातील आरसोली येथील जिल्हा परिषद शाळेत राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विद्यार्थ्यांच्या वाचन उपक्रमातून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिपक नागटिळक व नितीन पाटुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आंबेडकरांच्या जीवनचरित्रावर भाषण व गीतांच्या माध्यमातून प्रकाश टाकत त्यांना अभिवादन केले. जयंतीनिमित्त शाळेत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या




हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. याशिवाय, शाळेमध्ये सलग तीन तासांचा पुस्तक वाचन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात इयत्ता पहिली ते सातवीतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक बाळासाहेब भगत, समितीचे अध्यक्ष दिपक नागटिळक, उपाध्यक्ष नितीन पाटुळे तसेच सदस्य रोहित चंदनशिवे, नितीन गुंजाळ, कृष्णा गोयकर, विद्या वाघमारे, मोहिनी चंदनशिवे, माधुरी थेटे, राजश्री इजगज, अश्विनी खराडे, वैभव पाटुळे, समाधान मुंडेकर यांच्यासह शिक्षक, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परशुराम थाटे यांनी केले, तर प्रस्ताविक राजाभाऊ काळे यांनी केले.

# जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज सुरू, 21 एप्रिल अंतिम मुदत

**धाराशिव** :- युवकांच्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी सन 2025-26 या वर्षासाठी जिल्हास्तरावर 'जिल्हा युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आला असून इच्छुक युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांकडून 21 एप्रिल 2026 पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. या पुरस्कारांतर्गत एक युवक, एक युवती व एक संस्था यांना गौरविण्यात येणार आहे. व्यक्तींना गौरवपत्र, सन्मानचिन्ह व प्रत्येकी 10 हजार रुपये, तर संस्थेला गौरवपत्र, सन्मानचिन्ह व 50 हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील सामाजिक कार्य, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, क्रीडा, विज्ञान-तंत्रज्ञान आदी विविध क्षेत्रांतील योगदानाचा विचार केला जाणार आहे. मागील तीन वर्षांतील कार्याच्या आधारे निवड प्रक्रिया होईल. अर्ज व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, धाराशिव येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

आरंभ मराठी

## शिक्षक संघाचा अभिनव यशस्वी उपक्रम

# कळंब तालुक्यात 2500 विद्यार्थ्यांनी एकाच वेळी दिली शिष्यवृत्ती सराव परीक्षा

**आरंभ मराठी । कळंब**

कळंब येथील विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती परीक्षेतील आत्मविश्वास वाढावा आणि अधिक चांगला सराव व्हावा या उद्देशाने कळंब तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. तालुक्यातील तब्बल २५०० विद्यार्थ्यांनी एकाच वेळी शिष्यवृत्ती सराव परीक्षा देत या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने दिनांक २६ एप्रिल रोजी प्राथमिक (इयत्ता ४ थी) व उच्च प्राथमिक (इयत्ता ७ वी) शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा अधिक सराव व्हावा, अवघड प्रश्नांची उकल करता यावी आणि आत्मविश्वासाने परीक्षेला



सामोरे जाता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, तालुका शाखा कळंबच्या वतीने प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम साकार झाला. तालुक्यातील जिल्हा परिषदच्या १४० व नगरपरिषदेच्या २ अशा एकूण १४२ शाळांमधील विद्यार्थ्यांनी या सराव परीक्षेत सहभाग घेतला. यामध्ये इयत्ता ४ थीचे १५०० विद्यार्थी आणि इयत्ता ७ वीचे १००० विद्यार्थी अशा एकूण २५०० विद्यार्थ्यांचा समावेश होता. विशेष म्हणजे, शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या १०० टक्के विद्यार्थ्यांचा या सराव परीक्षेत सहभाग नोंदविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छापून नियोजनबद्ध पद्धतीने परीक्षा घेण्यात आली, ज्यामुळे हा उपक्रम तालुक्यात आदर्श ठरला आहे. दरवर्षी 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा' अभियान राबविणाऱ्या शिक्षक संघाने या उपक्रमातून गुणवत्तावाढीसोबतच जिल्हा परिषद शाळांबद्दल विश्वास निर्माण करण्याचाही प्रयत्न केला आहे. राज्यचिटणीस भक्तराज दिवाणे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल बारकुल, माजी अध्यक्ष दत्तात्रय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. ही सराव परीक्षा पुढील काळातही नियमितपणे घेतली जाईल, अशी माहिती तालुका संघाचे अध्यक्ष प्रशांत घुटे यांनी दिली. या सराव परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका अध्यक्ष प्रशांत घुटे, कार्याध्यक्ष महादेव मेनकुदळे, कोषाध्यक्ष प्रशांत निन्हाळ, सरचिटणीस संतोष लिमकर यांच्यासह मार्गदर्शक व सर्व पदाधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने परिश्रम घेतले. तसेच अनेक शिक्षकांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# सभापती गोकर्णा कदम यांच्याकडून उपळा गणात जनता दरबार

## नागरिकांच्या समस्यांचे तत्काळ निवारण; उर्वरित तक्रारी आठ दिवसांत सोडवण्याचे आश्वासन



**आरंभ मराठी । धाराशिव**

आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार उपळा येथे गुरुवारी (दि.16) जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम यांच्या अध्यक्षतेखाली उपळा येथील ग्रामपंचायत सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या जनता दरबारात उपळा गणातील उपळा, वरुडा, पवारवाडी, काजळा आदी गावांतील सरपंच, ग्रामसेवक, आशा व अंगणवाडी कार्यकर्त्या, सीआरपी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी विविध शासकीय विभागांशी संबंधित समस्या मांडल्या. त्यापैकी अनेक समस्यांचे संबंधित विभाग प्रमुखांनी तात्काळ निवारण केले. ज्या समस्या तातडीने सोडवता आल्या नाहीत, त्या संदर्भातील निवेदने स्वीकारून येत्या आठ दिवसांत त्या मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी सर्व शासकीय विभागांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला व नागरिकांच्या अडचणींवर सविस्तर चर्चा झाली. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या शिंदे, पंचायत समिती सदस्य प्रियाताई घोगरे, उपळा येथील सरपंच मुन्ना घोगरे, रोहित पडवळ, चिंटू पाटील यांच्यासह उपळा गणातील बूथ प्रमुख, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे विभाग प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांनीही सहभाग नोंदवला. जनतेच्या समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांचे जलद निराकरण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा जनता दरबार यशस्वीरीत्या संपन्न झाला.

आरंभ मराठी

नांदुरीत शाळेचा सांस्कृतिक जल्लोष; स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे रंगतदार सादरीकरण

–

धाराशिव; तुळजापूर तालुक्यातील नांदुरी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन

कार

अध

सरप

नान

गाडे

उपा




सीएसआर अंतर्गत बालाजी अमाईन्सकडून तामलवाडी शाळेला रंगकाम

आरंभ मराठी / तामलवाडी

बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर ( कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी ) उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथील

त्साहात

बोलकी

